# डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळ

**DVMMM: Delaware Valley Marathi Mitra Mandal**

## हितगुज

वर्ष २, अंक २ जून ९, २००३

**DVMMM Executive Committee**

**President**
Vaneeta Kubal
(302) 453-8738

**Vice President**
Prashant Karandikar
(610) 268-0807

**Treasurer**
Vinay Pradhan
(302) 239-0542

**Secretary**
Ashish Chaughule
(302) 235-7295

**Cultural Secretary**
Pradip Khaladkar
(302) 239-6204

**WebPage/YahooGroups**
Sandeep Karode
(302) 478-6789

**Karyakarte**
Anjou Sathe-Keller
(302) 376-1994
Samarth Joshi
(302) 892-2887
Shaila Vaidya
(610) 274-8627

**http://www.dvmmm.org**

**http://groups.yahoo.com/groups/marathimandal**



### सहल

पावसाची रिप-रिप केव्हा एकदा बंद होते आहे असे सर्वांना झाले आहे. मे-जून अगदी मुंबईच्या पावसाळयाची आठवण करून देत आहे. हया मूडमधून बाहेर पडण्यासाठी आपण १४ जूनला सहल काढत आहोत लमस पॉडला. संख्याशास्त्रानुसार एक ७0-७५ डिग्रीजचा, पाऊसविरहीत दिवस यायला आता खरी हरकत नाही. सहलीचा कार्यक्रम इतरत्र दिला आहे. पाऊस आलाच तर सहल २८ जूनला (रेन डेट) असेल. “सहल २८ ला करू शकाल का?” अशी विचारणा काही लोकांनी केली. म्हणून शेवटी ३१ मे च्या समिती मीटिंगमधे सर्व सभासदांना दूरध्वनी करून विचारणा केली. त्याच्यानुसार शेवटी सहल १४ लाच निश्चित केली. हया घटकेला तरी वेदर.कॉम वर ७९ डिग्रीज आणि पार्टली क्लाउडी असा अंदाज सांगत आहेत. मंडळ वर्षातून एक कार्यक्रम विनामूल्य देणार आहे तो म्हणजे सहल - तेव्हा नक्की यायचे बरका.

आपल्या सर्वांच्या मदतीने ५ एप्रिलचा होळी-पाडव्याचा कार्यक्रम आनंददायी झाला. गुढया-पताकांच्या सजावटीने सणाचे वातावरण निर्माण झाले. नेहमी प्रमाणे लहान मुलांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. तुषार गोडबोले व कुमारी राजाध्यक्ष यांनी प्रथम प्रार्थना म्हंटली. त्यानंतर नीता वैद्द व सागर करंदीकर यांनी होळी व पाडवा ह्या सणांचे महात्म्य सांगितले. ओंकार बक्षीने रामस्तुती तोंडपाठ म्हंटली आणि ईशा बक्षीने एक कविता हावभावासकट सादर केली. सर्व मुलांना डिव्हीएमएमएमचा लोगो असलेला कप बक्षीस देण्यात आला. गाण्याच्या कार्यक्रमाची तयारी होता होता मालती पेंडसे यांनी त्यांच्या यजमानांच्या कवितांचे वाचन केले. ह्यानंतर डेलावेअर, न्युजर्सी व वेस्टचेस्टरच्या कलाकारांनी गाण्यांचा एक अप्रतीम कार्यक्रम साजरा केला. कलाकारांनी घेतलेली मेहनत व केलेला रियाज जागो जागी दिसत होता. कांती गोडबोले व केदार गोखले यांच्या अवखळ निवेदनाने गण्यांची एक सुरेख माळ गुंफली गेली. मनोज राजाध्यक्षने लिहीलेल्या “होली अपने स्टाईलमे” ह्या कवितेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अमेरिकेत गुलाल आणि पाण्यातले रंग वापरता येत नसले तरी गाण्यांच्या विविधरंगी इंद्रधनूने ही होळी आपण साजरी करू असा निर्धार त्यात होता. त्यानंतर रंगली एकाहूनएक सुरेख गाण्यांची मैफल. सीमा लिमये, संगिता विध्वांस, हर्षद अभ्यंकर, योगेश काटदरे, मनोज राजाध्यक्ष, व अवनीश लिमये ह्या गायकांबरोबर सुनिल गोडबोले (तबला), नरेंद्र चिरमुले (तबला), हर्षद अभ्यंकर (ढोलके), विजय बेडेकर (विविध वाद्द), वनीता कुबल (पेटी), व मनोज राजाध्यक्ष (की बोर्ड) ह्यांनीही उत्कृष्ट साथ केली. सुरेंद्र करमरकर यांनी ध्वनी व्यवस्था सांभाळली. या सर्वांना मंडळातर्फे डिव्हीएमएमएमचा लोगो असलेले कप देऊन त्यांचे आभार मानण्यात आले. विशेष म्हणजे फिलाडेल्फियाच्या मराठी मंडळाने ह्याच कलाकारांनी तिथे असाच कार्यक्रम सादर केला म्हणून त्यांचा ध्वनिवर्धक संच आपल्याला विनामूल्य दिला होता. त्याबद्दल फिलीच्या मंडळाचे आभार. कार्यक्रमाचा शेवट पुरणपोळी व वरण भाताच्या आस्वादाने झाला.

होकॅसन हिंदू टेंपलच्या ४0 दिवसांच्या कोटी कुंकु अर्चनेपैकी दोन रविवारी मंडळाच्या सभासदांनी श्रमदान व अर्थदान करून सर्व उपस्थित भाविकांना रात्रीचे जेवण पुरवले. आपला मेन्यू व आयोजन प्रशंसक होते असे मत टेंपलच्या अधिकारयांनी व्यकत केले. ह्या उपक्रमात भाग घेतलेल्या सर्व सभासदांचे मनापासून आभार! तेव्हा आता भेटू सहलीला!

- प्रशांत करंदीकर

## एक व्यथिता

अलिकडच्या एका भारत भेटीत एक जुनी वही सापडली शाळेत असतानाची! ते अल्लड दिवस आठवले. वहीची पाने उलटता उलटता मनही वेगाने भूतकाळात शिरले व एका पानावर स्थिर झाले. एक काव्यरचना दिसली मला सुचलेली पहिली वहिली कल्पना मेणबत्तीवर ! अजुनही मेणबत्तीचे खुप आकर्षण आहे मला. दुकानातून फिरताना वेगवेगळया रंगांच्या व सुवासांच्या मेणबत्त्या पाहतांना अजुनही मन वेडे होते. असे वाटते ती कितीही सुंदर असली तरी ती केविलवाणी आहे. व्यथिता आहे.




### एक व्यथिता

ती एक व्यथिता
जळते परोपकारा
सारते अंधकारा
देते प्रकाशा आसरा

ती एक व्यथिता
आहे एकाकिनी
म्हणुनच का केविलवाणी
भासते ती विरहिणी?

ती एक व्यथिता
मुकाश्रू ढाळीत ढाळीत
साकारते प्रीतीगीत
सजिवते भाव अमूर्त

ती एक व्यथिता
आसवमाला तिची परी
वाळुनी जाते तरी
सखा ना तिचा अवतरी

ती एक व्यथिता
शमा नाम तियेचे
कृत्य तिचे झिजण्याचे
अपूर्त जरी चित्र स्वप्नांचे

ती एक व्यथिता
होईल एके दिनी मृत
होईल का कुणी दु:खित
आगळीच असे जनरीत

- वनीता कुबल

**डिव्हीएमएमएम चे आगामी कार्यक्रम**

| | |
|---|---|
| पिकनिक | जून १४ (पाऊस दिवस जून २८) |
| गणेशोत्सव (आणि निवडणूक समिती स्थापना) | ऑगस्ट ३१ ते सप्टेंबर ६ |
| दिवाळी (आणि २००४ कमिटीच्या निवडणुका) | नोव्हेंबर २ |
| मकर संक्रांत (नव्या कमिटीचे उद्घाटन) | जानेवारी १४, २००४ |

## डिव्हीएमएमएम सहल

**Date:** Saturday, June 14, 2003 **Please RSVP by 6/7/2003 to any DVMMM Committee Member**
**Time:** 10 AM to 5 PM
**Location:** Lums Pond State Park, About 6-7 miles south of Newark, DE on Rt. 896 (see directions at http://www.dvmmm.org – events - picnic)
**Admission:** Free to Members, $5 non-members.
**Events:** क्रिकेट, लगोरी, खोखो, हुतूतू (कबडडी), व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेनिस, बोटिंग, बाइकिंग, पाऊलवाटा . . .
पुरी-भाजी, दहीभात, कलिंगड, ब्राउनीज, आइसक्रीम, चिपस, सोड, चिवडा, पाणी इत्यादी

# गणेशोत्सव

गणेशोत्सवाची तयारी सुरू होत आहे. हया वर्षी गणेश चतुर्थी ३१ ऑगस्ट म्हणजे रविवारी आली आहे. शिवाय १ सप्टेंबरला लेबर डे ची सुट्टी आहे. आणि ६ सप्टेंबरला विसर्जन (शनिवार) हयामुळे करमणुकीचे कार्यक्रम करायला तीन दिवस आहेत. आत्ताच्या आरेखनानुसार पुढीलप्रमाणे कार्यक्रम असेल. हयात अजून थोडाफार फेरबदल होण्याची शकयता नाकारता येत नाही.

| | |
|---|---|
| ३१ ऑगस्ट | १0 आगमन पूजा प्रतिस्थापना, १२ प्रसाद जेवण (सर्व उपस्थित भाविक) मंडळाने प्रायोजित सायंकाळी ८ ते १0 नाटके |
| १ सप्टेंबर | १२ ते २ मंडळाचे जेवण (सभासद व त्यांचे पाहुणे), २ ते ५ करमणुकीचे कार्यक्रम |
| ६ सप्टेंबर | २ ते ५ करमणुकीचे कार्यक्रम , ५ विसर्जन |

करमणूकीच्या कार्यक्रमात नाटक, नाच, गायन, व्याख्यान, कीर्तन, कथा-कविता वाचन, लहान मुलांचे कार्यक्रम इत्यादीचा समावेश असेल. कार्यक्रम करण्यात मंडळाच्या सभासदांना प्राधान्य दिले जाईल. विविध कार्यक्रमात ज्यांना भाग घ्यायचा असेल त्यांनी खालील कार्यकर्त्यांशी त्वरित संपर्क साधावा (३१ जुलैच्या आत).

| | |
|---|---|
| नाटक : | समर्थ जोशी (३0२) ८९२-२८८७ |
| गायन : | वनीता कुबल (३0२) ४५३-८७३८ |
| नाच : | राधिका जोशी (३0२) ८९२-२८८७ |
| मुलांचे कार्यक्रम : | शैला वैद्य (६१0) २७४-८६५७ |
| इतर कार्यक्रम : | प्रशांत करंदीकर (६१0) २६८-0८0७ |

---

नमस्कार.

गेले नऊ महीने आम्ही दोघं एक स्वप्नं पहात होतो; एक इवलंस स्वप्नं गोंजारत होतो, जोपासत होतो. स्वप्नपूर्तीची वेळ आली; आणि अचानक, आमची स्वप्नं काळझोपेत लुप्तं झाली.

चि.सानिका जन्मं: ६ मे २००३ देवाज्ञा: ५ मे २००३.

दुर्दैवाच्या हया आघाताने आम्ही कोलमडलो. आयुष्यातील हया कठीण क्षणांना सामोरं जात असताना प्रसन्नच्या कणखर हातांनी आम्हाला आधार दिला, वनिता मावशीचा मायेचा हात आमच्या पाठीवरून फिरला, मंजूनी सतत प्रेमाची साथ दिली. आशिष-आश्लेषा, अनूप-संगीता, अवनीश-सीमा-काका, राधिका-श्रीराम, संदीप-माधुरी, सुमीत-रेश्मा, राजीव-शैला-आजी, सीमामावशी, विनय-प्राची-माया प्रधान, सचिन-किरण, श्रुती-मनोज, सौरभ, प्रशांत, डॉक्टर काका,तुम्ही आम्हाला बळ दिलंत. दु:खं विसरू शकत नाही, पण ते हलकं तुम्ही केलतं.

देवाने कोणावरही अशी वेळ आणू नये, पण आणलीच तर भोवती तुमच्यासारखी माणसं पेरावित, प्रेमाच्या सावलीत राहून संकटांना धीरानं सामोरं जायला. मदतीची साद घातलेल्या **DVMMM**च्या सर्व सभासदांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

समर्थ-राधिका.

हया सर्व घटनेत सतत बरोबर असणारी आणि आपल्या सर्वांची उतराई होऊ न शकणारी, तुमचे सर्वांचे मन:पूर्वक आभार मानत आहे.

शिल्पा (राधिकेची आई)